


**Chief Editor:**
**Prof. Anil G. Dodewar**

**Co-Editor:**
**Dr. C. I. Gitte**

**Published by :**
UPA Group Publication
In Association with
University Professors' Association
38, Mitra Nagar, Manewada Cement Road,
Nagpur-24

**Corporate Office:**
38, Mitra Nagar, Manewada Cement Road, Near Katarmal's Shalini Palace,
Nagpur-24

**Publication :**
The UPA Interdisciplinary e-journal is published Bi-annually.
© All Rights Reserved.
The views expressed in this publication are purely personal judgments of the authors and do not reflect the views of the Journal or the body under whose auspices the journal is published.

**Subscriptions:**
UPA Interdisciplinary e-journal is an open access journal hosted at www.upa.org.in

| UPA e-Journal is available online for downloads | Send your valuable feedback to |
|---|---|
| www.upa.org.in/ejournal Issue-VI | upanagpur@gmail.com<br>upajournal@gmail.com |

# From the Editor's Desk

As all the well-wishers and contributors to UPA Online E-Journal are well aware of the fact that it is our practice to take up a burning or current issue and invite the scholarly articles from the academicians on it. We are very happy to share this fact that for this issue we have taken up the current issue of Revised Methods of Assessment and Accreditation for Colleges. we hope the scholars and academicians will

| | | | |
|---|---|---|---|
| 15 | Prof. Shitalbabu Tayade | Reality of the Pensioners Reflected in the W. B. Yeats's 'The Lamentation of the Old Pensioner' | 64 - 66 |
| 16 | Dr. Waman Jawanjal | Pension Scheme for Government Employees: Issues & Concerns | 67 - 72 |
| 17 | Dr. Aarti B. Padole | Future Need - Old Pension | 73 - 75 |
| 18 | Dr. Jayant Kumar Ramteke | A Comparative Study of Health Related Physical Fitness of Rural and Urban Regions Nagpur District Maharasthra State and C.B.S.C. Board School Boys | 75 - 80 |
| 19 | Dr. Meena Balpande | Pension Scheme and Social Security | 81 - 83 |
| 20 | प्रा. सुधाकर माटे | पेंशन योजना आणि सामाजिक सुरक्षा | 84 - 91 |
| 21 | डॉ. विद्या भैसारे | जुनी पेंशन योजना आणि नवीन पेंशन योजनाविषयी विचारमंथन | 92 - 94 |
| 22 | प्रा. विलास वानखेडे | पेंशन योजना व सामाजिक सुरक्षा | 95 - 96 |
| 23 | डॉ. ए. एम. लाटे | नवीन पेंशन योजना : एक मृगजळ | 97 - 98 |
| 24 | डॉ. अनुराधा खाडे | जुनी पेंशन योजना आणि नवीन पेंशन योजनेमधील तफावत | 99 -100 |
| 25 | प्रा. अर्चना खंडागळे | निवृत्ती वेतन योजना आणि सामाजिक सुरक्षा | 101 - 106 |
| 26 | डॉ. आस्तीक मुंगमोडे | वर्तमान अंशदायी योजना व कर्मचारी | 107 - 110 |
| 27 | डॉ. भीमराव उबाळे | निवृत्ती वेतन योजना आणि सामाजिक सुरक्षितता : एक चिंतन | 111 - 113 |
| 28 | प्रा. देवमन उंबरकर | सरकारी कर्मचाऱ्यांसाठी पेन्शन योजना : समस्या आणि चिंता | 114 - 126 |
| 29 | प्रा. गणेश कापसे | एकच मिशन – जुनी पेन्शन | 127 - 130 |
| 30 | प्रा. गणेशकुमार पेठकर | जुनी पेंशन योजना विरुध्द नवीन पेंशन योजना | 131 - 134 |
| 31 | डॉ. मारोती तेगमपुरे | पेन्शन म्हणजे अधिदान – अनुदान नव्हे | 135 - 141 |
| 32 | डॉ. नलिनी बोरकर | राष्ट्रीय पेंशन योजना (NPS) : समस्या व आव्हान | 142 - 145 |

# निवृत्ती वेतन योजना आणि सामाजिक सुरक्षितता एक चिंतन

प्रा.डॉ. भिमराव प्र. उबाळे
संत भगवान बाबा कला महाविद्यालय
सिंदखेड राजा, जि.बुलडाणा

सरकारी कर्मचाऱ्यांसाठी असलेली निवृत्ती वेतन योजना शासनाने 01/01/2004 पासुन बंद केली. आणि निवृत्ती कर्मचाऱ्यांचा जणु जगण्याचा अधिकारच काढून घेतला. आयुष्यभर शिक्षण आणि नोकरी यातच वेळ गेल्यानंतर जे कर्मचारी निवृत्त होतात. त्यांना सुखा–समाधानाने जिवन जगता यावे. किमान निवृत्ती अंतर तरी जिवनाचा आनंद उपयोगता यावा यासारख्या उददत हेतुने निवृत्ती वेतन योजना सुरू केली होती. अनेक जन तर निवृत्त होण्याअगोदरच जगाचा निरोप घेतात. त्यांच्या पश्चात त्यांच्या कुटुंबाची जी वाताहत होते. ज्या सदस्यांना त्यांना सामोरे जावे लागते. त्या समस्या एकूण किंवा सांगुन समजणार नाही. "जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे" या उक्तीप्रमाणे प्रत्यक्ष स्वतःवर प्रसंग आल्याशिवाय त्यांचे गांभिर्य कळत नाही. निवृत्त वेतन बंद करून शासनाने कर्मचाऱ्यावर फार मोठा अन्याय केला आहे.

भारत सरकाने सरकारी कर्मचाऱ्यांसाठी सुरू केलेली "निवृत्ती वेतन योजना" ही कर्मचाऱ्यासाठी म्हातारपणचा आधार होती. तीच त्यांची म्हातारपणाची काठी होती. की, जिच्या आधारावर उर्वरीत आयुष्य ते आनंदात व समाधानात जगणार होते. वयाच्या 58 ते 60 वर्षांपर्यंत आपापल्या खात्यात प्रामाणिकपणे सेवा दिल्या नंतर जेव्हा तो कर्मचारी निवृत्त होतो, तेव्हा त्याला इतर कोणतेही काम करणे जमत नाही. अनेकांचे शरीर काम करण्याची इच्छा असतांना देखिल साथ देत नाही. अनेक शारीरिक व्याधी या वयात जडलेल्या असतात. वैद्यकिय खर्च मोठ्या प्रमाणावर वाढलेला असतो. मुला मुलीच्या शिक्षण व लग्नावर खुप खर्च झालेला असतो. ते आपापल्या संसारात मग्न असतात. अनेकदा मुली सासरी तर मुल नोकरी, धंदयासाठी दुर बाहेरगावी असतात. अनेक कुटुंबात उत्पन्न कमी असल्यामुळे संकुचित मानसिकतेमुळे म्हातारे/वृध्द व्यक्ती त्यांना ओझे वाटू लागतात. त्यांच्याकडे कळत न कळत, तर कधी जाणीवपुर्वक दुर्लक्ष केल्या जाते. त्यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांनाच नव्हे तर समाजातील सर्वच वृद्ध व्यक्तींना निवृत्ती वेतन योजना शासनाने बंद करून निवृत्त कर्मचाऱ्यांना वाऱ्यावरच सोडले आहे. असेच म्हणावे लागेल.

जुनी निवृत्ती वेतन योजना सामाजिक व वैयक्तिक सुरक्षिततेसाठी अत्यंत महत्वाची होती. निकोप सामाजिक जिवनासाठी, नोकरी समाधानाने करण्यासाठी आणि नोकरी संपल्यानंतर ही मरेपर्यंत आपण आपली जबाबदारी, आपल्या गरजा पुर्ण करण्यास समर्थ असल्याची प्रबळ भावना प्रत्येक कर्मचाऱ्यास जगण्याची हिम्मत देत होती. आपण संपल्या नंतरही आपल्या पत्नीस किंवा पतीस निवृत्ती वेतन काही अंशी मिळतच होते. कुटुंबाच्या स्थैर्यांचा निवृत्ती वेतन हा मोठा आधार प्रत्येक कुटुंबास होता. हा जिवनाच्या विशिष्ट वळणावरचा आधारच शासनाने काढून घेतला आहे. या आधाराविना निवृत्त कर्मचारी पोरके बनले आहेत. परावलंबित्वाच्या भावनेने त्यांना जगणे नकोसे वाटत आहे. अनेकांना स्वाभिमान शुन्य जिवन जगावे लागत आहे.

ज्या उद्दात हेतुने ही कल्याणकारी जुनी निवृत्ती वेतन योजना सुरू झालेली होती, त्यात काही सुधारणा करून तिची व्यापकता वाढविण्याची आज समाजास व देशास गरज होती. परंतु शासनाने परवडत नाही. पुरेशी तरतुद नाही. म्हणून सरकारी कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन बंद करून उतारवयात त्यांचा छळ करण्याचीच भूमिका घेतली का? असा प्रश्न सुज्ञ व जाणकार नागरीकास पडल्यावाचून राहत नाही. आयुष्यभर सेवा करून जेव्हा त्याचे शरीर थकते, जेव्हा पैशाची नितांत गरज असते, तेव्हाच शासनाची काक दृष्टी त्याच्यावर पडावी आणि समस्यांचा डोंगर माथ्यावर घेवुन त्याला जीवन जगावे लागते यास शासनाची क्रुर खेळीच म्हणावे लागेल.

समाजातुन आज अनेक सामाजिक नितिमुल्यांचा ऱ्हास होत आहे. नव्हे त्या नितीमुल्यांच्या ऱ्हासास आपण सर्वच जन जबाबदार आहोत. वृद्ध व्यक्तींचा सन्मान करा, त्यांची काळजी घ्या, त्यांना वाऱ्यावर सोडु नका, त्यांच्या अनुभवाचा फायदा घ्या एकीकडे आपली नितिमुल्य असे सांगत असतांना, आपण सामाजिक परिस्थिती तीचे भान न ठेवता, निवृत्ती वेतन बंद करणे कोणत्या तत्वात बसते हेच कळत नाही. प्रत्येक समाजाची, देशाची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. महागाई गगणाला भिडली आहे. बेकारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. खर्चिक उच्च शिक्षण घेवुन ही नोकऱ्या लागत नाहीत. 'सेज', 'मॉल' व इंटरनेटच्या या जमाण्यात अनेक लहान–मोठे उदयोग बंद पडत आहेत. निसर्गाचा प्रकोप दिवसेंदिवस वाढत आहे. अनेकांना इच्छा असतांना ही काय मिळत नाही. अनेक अवैध व्यवसांयाचा व धंदयांचा महापुर आला आहे. अशा अनेक समस्या आज देशातील प्रत्येक व्यक्ती समोर असतांना निवृत्त कर्मचाऱ्याचे निवृत्त वेतन बंद करणे म्हणजे आपण कोणत्या नितिमुल्यांची जपवणुक व रूजवणुक करीत आहोत हा संशोधनाचाच विषय ठरेल.

सर्वच कर्मचाऱ्यांना फार मोठे पगार नसतात सेवेत असतांना त्यांना इतर व्यवसाय किंवा उदयोग करण्यावर शासकीय बंधने असतात. नव्हे तो करून शकत नाही. जी.पी.एफ. किंवा एल.आय.सी. सारख्या पॉलिसीजच्या माध्यमातून जमा झालेला पैसा मुलांचे शिक्षण, लग्न, नोकरी, आजारपण, सामाजिक सण समारंभ, घर, गाडी खरेदी या कामासाठी केव्हाच संपूण गेलेला असतो. उलट बँका व खासगी सावकारांचे कर्ज अनेक कर्मचाऱ्यांच्या डोक्यावर असते. निवृत्ती नंतर त्यांना जीवन जगण्यासाठी निवृत्ती वेतनाची सक्त गरज असते. निवृत्त झाल्यानंतर अचानकच त्याला मिळणारे वेतन जेव्हा बंद होते. तेव्हा त्या व्यक्तीसमोर कुटुंबासमोर अनेक प्रश्न 'आ' वासुन उभे असतात. तेव्हा त्याला जीवनाच्या दाहकतेची जाणीव होण्यास सुरूवात होते. आपले जीवन संपल्याची भावना त्याला सतावू लागते. अस्मानी संकटापेक्षा ही निवृत्ती वेतन बंदचे संकट अत्यंत भयंकर असल्याची भावना निवृत्ती कर्मचाऱ्यापुढे निर्माण झाली आहे. निवृत्त वेतन बंदचे समाजावर अनेक वाईट परिणाम होत आहेत.

1. निवृत्त कर्मचाऱ्यांची सामाजिक व कौटुंबिक हेळसांड
2. वृद्धाश्रमांच्या संख्येत वाढ.
3. सरकारी नोकरी करण्या विषयी अनास्था
4. नोकरी शिवाय इतर उदयोगाकडे लक्ष
5. नोकरीत एकनिष्ठतेची भावना राहणार नाही
6. सरकारी कर्मचाऱ्यांचे आर्यूमान कमी होईल
7. निवृत्त कर्मचाऱ्यात आत्महत्येचे प्रमाण वाढेल

8. भिकारी प्रवृत्तीत वाढ होईल
9. कौटुंबिक कलहात वाढ होईल
10. मनोरूग्णाची संख्या वाढेल
11. भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढेल

यासारख्या अनेक वाईट परिणामांना निवृत्ती वेतन बंद झाल्यामुळे समाजाला व देशाला सामोरे जावे लागेल व देशात निवृत्त कर्मचाऱ्यांची एक नवीन समस्या निर्माण होईल. समाजहिताच्या दृष्टीने निवृत्ती वेतन प्रत्येक कर्मचाऱ्यालाच नव्हे तर वयाची 58 ते 60 वर्ष पूर्ण केलेल्या देशातील प्रत्येक व्यक्तीला मिळणे ही आजची गरज बनली आहे. निवृत्त वेतनासाठी ठराविक निधि गोळा करण्याची यंत्रणा सरकार जवळ असली पाहिजे. त्यासाठी साठ वर्षाच्या आतील व्यक्तीवर एक ठराविक निवृत्ती वेतन कराची देखिल तरतुद करणे आवश्यक आहे. प्रत्येक पंचवार्षिक योजनेमध्ये ही निवृत्त वेतनासाठीची तरतूद असली पाहिजे.

एकंदरीत निवृत्ती वेतन ही समाजाची एक आवश्यक गरज बनली आहे. समाजाच्या निकोप व सर्वांगिण विकासाच्या आराखड्यात निवृत्ती वेतनाचा मुद्दा देखिल अत्यंत महत्वाचा आहे. वृध्दांच्या जगण्याचा तो आधार आहे. काळाची गरज आहे.